देवगड जामसंडे नगरपंचायत,
जा.क्र.दे.जा.न.पं. ११०० /२०२६
दिनांक : १२/०५/२०२६

## ई निविदा सूचना सन २०२६ - २७

मुख्याधिकारी, देवगड जामसंडे नगरपंचायत खाली नमूद केलेल्या कामांसाठी पंजीकृत मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून ई- निविदा पध्दतीने निविदा मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम (निव्वळ रक्कम) | बयाणा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | कामाची मुदत | निविदा शुल्क (१८% जीएसटी शुल्कासहीत) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 1 | देवगड जामसंडे नगरपंचायत अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनाच्या दैनंदिन कामांकरीता वार्षिक मनुष्यबळ सेवा पुरवठा करणे. | १,१२,३६,६३०/- | १,१२,३६७/- | ५% देयकातून कपात | १२ महिने | २३६०/- |

## ई –निविदा प्रक्रियेच्या दिनांक वेळेचा तपशील

| अ. क्र | प्रकियेचा तपशील | पासून | | पर्यंत | |
|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
| १ | निविदा प्रसिध्दी | १४/०५/२०२६ | सकाळी १०.०० पासून | २१ /०५/२०२६ | १७.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदा डाऊनलोड करणेचा कालावधी | १४/०५/२०२६ | सकाळी १०.०० पासून | २१/०५/२०२६ | १७.०० वाजेपर्यंत |
| ३ | निविदा ऑनलाईन भरणेचा अंतिम दिनांक | १४ /०५/२०२६ | सकाळी १०.०० पासून | २१/०५/२०२६ | १७.०० वाजेपर्यंत |
| ४ | ऑनलाईन तांत्रिक बोलीचा लिफाफा उघडण्याचा दिनांक (शक्य झाल्यास) | २२ /०५/२०२६ | १०.०० पासून | – | – |
| ५ | ऑनलाईन निविदा उघडयाचे स्थळ | मा. मुख्याधिकारी, देवगड नगरपंचायत यांचे दालनात उपस्थित कंत्राटदार अथवा अधिकृत प्रतिनिधी समक्ष | | | |

देवगड जामसंडे नगरपंचायत
स्थापना
जि. सिंधुदुर्ग

Scanned with OKEN Scanner

देवगड जामसंडे नगरपंचायत स्थापना २२ मार्च २०१६

# अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १ | सर्व पात्र इच्छुक कंत्राटदार यांनी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे. |
| २ | ई – निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी कंत्राटदाराने प्रथम डिजीटल सिग्नेचर सर्टीफिकेट (DSC) युजर आय. डी. व पासवर्ड करुन घेणे आवश्यक आहे. |
| ३ | निविदेतील बी -1 नमुन्यतील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारांना बंधनकारक राहील. |
| ४ | वरील कामाची निविदा प्रक्रिया ई- निविदा प्रक्रियेद्वारे ऑनलाईन कण्यात येत असून या निविदेसंबंधी यापुढील सर्व सूचना /शुध्दीपत्रके www.mahatenders.gov.in या वेबसाईटच्या माध्यमातून ऑनलाईन करण्यात येतील. |
| ५ | वरील कामाबाबत संपूर्ण माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ६ | • ऑनलाईन निविदा सादर करताना तांत्रिक लिफाफा नं. 1 (Envelop No.1) मध्ये खालील प्रमाणे कागदपत्रे अपलोड करावयाची आहेत.<br>• ऑनलाईन निविदा फी व बयाणा पावती<br>• कंत्राटी कामगार अधिनियम १९७० अंतर्गत कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र.<br>• महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नोकरी व सेवा शर्तीचे विनियमन अधिनियम २०१७ नुसार नोंदणी प्रमाणपत्र.<br>• मागील ३ वर्षाचे आयकर प्रमाणपत्र.<br>• जी.एस.टी प्रमाणपत्र<br>• अनुभव प्रमाणपत्र. (घनकचरा विषयी किमान रु.१ कोटीची कामे पूर्ण केल्याचे शासकीय यंत्रणेकडील दाखला)<br>• पॅनकार्ड<br>• स्वपत्रावर परिशिष्ट अ व ब.<br>• भागीदारी संस्था असल्यास भागीदारी करार.<br>• भविष्य निर्वाह निधी कायद्यांतर्गत विभागाकडे नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र व EPF भरणा केलेबाबतची किमान ६ महिन्याची चलने, ESIC नोंदणी प्रमाणपत्र व ESIC भरणा केल्याबाबतचे ६ महिन्याचे प्रमाणपत्र.<br>• घनकचरा व्यवस्थापन सेवा पुरविणे संबंधी ISO नोंदणी प्रमाणपत्र.<br>• रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर सर्व कागदपत्रे खरी असल्याचे प्रतिज्ञापत्र, कोणत्याही नगरसेवकांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नसलयाचे प्रतिज्ञापत्र, काळया यादीत नाव समाविष्ट नसल्याचे व नगरपंचायतीच्या सर्व अटी बंधनकारक असल्याचे प्रतिज्ञापत्र.<br>• सदर कामाबाबत Geo Tag फोटोसह, स्थळ पाहणी अहवाल, कृती आराखडा तयार करून मा. मुख्याधिकारी यांना सादर करून त्याबाबतचे प्रमाणपत्र मा. मुख्याधिकारी, देवगड जामसंडे यांचे कडून घेऊन तांत्रिक लिफाफ्या सोबत सादर करणे बंधनकारक.<br>• स्वच्छ भारत अभियानांतर्गत किमान एका नगरपंचायतमध्ये THREE STAR मानांकन प्राप्त झालेल्या कालावधीत काम सुरु असलेबाबतचे मा. मुख्याधिकारी यांचे कडील प्रमाणपत्र. |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| ७ | निविदाधारकाने एकदा ऑनलाईन भरलेली निविदा कोणत्याही परीस्थितीत मागे घेता येणार नाही. तसे केल्यास निविदेसोबत भरणा केलेली बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. मुख्याधिकारी, नगरपंचायत देवगड जामसंडे यांनी राखून ठेवलेला आहे. |
| ८ | कोणत्याही परिस्थितीत Price Escalation देण्यात येणार नाही. तसेच सदर काम हे शासकीय निधीमधून करण्यात येणार असून निधीच्या उपलब्धतेनुसार देयक अदा करण्यात येईल. नगरपंचायतीकडून वेतन अदा करण्यास विलंब झाला तरी नियुक्त कर्मचारी यांना मक्तेदाराने दरमहाचे वेतन वेळेत अदा करणे बंधनकारक आहे. |
| ९ | महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती, औदयोगिक नगरी अधिनियम 1965 व महाराष्ट्र लेखा संहिता 2011च्या सर्व तरतुदी या निविदेला लागू राहतील.<br>अ) सदर कामाची निविदा मंजूर झाल्यानंतर नियमानुसार आयकर, GST कामगार कल्याण उपकर, कामगार विमा व इतर आवश्यक (EPF, ESIC)त्या कपाती देयकातून करण्यात येतील. |
| १० | नियुक्त कर्मचारी यांना नियमित कामाव्यतिरीक्त नगरपंचायतीस अत्यावश्यक व आपत्कालीन परिस्थितीत सुसंगत असणा-या सर्व प्रकारची कामे करावी लागतील. अन्यथा आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ तसेच महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम २०११ (MESMA) अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल. |
| ११ | सदरचे काम हे संपूर्णपणे कंत्राटी असून त्याअंतर्गत कार्यरत कर्मचारी यांना भविष्यात कायमस्वरूपी नोकरीबाबत देवगड जामसंडे नगर पंचायतीकडे हक्क मागता येणार नाही. |
| १२ | मंजूर निविदाधारकाने निविदांचे कामाचे किंमतीनुसार योग्य त्या मुद्रांक शुल्क पेपरवर कामाचा करारनामा करून देणे बंधनकारक आहे. |
| १३ | कर्मचा-यांना साफ सफाईसाठी आवश्यक साधने, गणवेश, रेनकोट, ओळखपत्र ई. पुरविणे मक्तेदारास बंधनकारक आहे. |
| १४ | निविदा सूचना ही कामाच्या करारनाम्याचा भाग राहील. |
| १५ | सदर कामकरीता भागीदारी असेल तर निविदाधारक यांचेवतीने कुलमुखत्यार यांनी निविदा सादर केल्यास त्याबाबतचे आवश्यक सर्व कागदपत्रे (नोंदणीकृत कुलमुखत्यार इत्यादी) निविदे सोबत सादर करणे निविदाधारक यांजवर बंधनकारक राहील. |
| १६ | कामाच्या मुदतीच्या आत काम न केल्यास कमीत कमी रु. ५००/- प्रतीदिन दंड स्वरुपात कामाच्या देयकातून कपात करण्यात येईल. तसेच कामास मुदतवाढ हवी असल्यास कामाची मुदत पूर्ण होणेपुर्वी १ महिना अगोदर अर्ज करणे मक्तेदार यांस बंधनकारक राहिल. तसेच मा. मुख्याधिकारी यांना योग्य वाटल्यास कामासाठी असलेल्या मुदतीच्या अर्धा कालावधी इतकी अथवा मा. मुख्याधिकारी ठरवतील इतकी मुदतवाढ देण्यात येईल. |
| १७ | कामगार कल्याण, बाल कामगार तसेच सबंधित सर्व शासन निर्णय, आदेश व प्रचलित नियम इत्यादीचे पालन करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. |
| १८ | निविदाधारक यांनी सदर कामाची व्याप्ती व स्वरूप, कामाची जागा, साहित्य उपलब्धता याची संपूर्ण माहिती नगरपंचायत कार्यालयात प्राप्त करून घ्यावयाची आहे व तद्नंतर निविदा भरावयाची आहे. मागाहून कोणतीही तक्रार दाखल करून घेतली जाणार नाही. |
| १९ | सदर काम शासकीय योजनेंतर्गत मंजूर असल्याने विहित मुदतीत काम करणे बंधनकारक असून निधीच्या उपलब्धतेनुसार व कामाच्या प्रगतीनुसार टप्याटप्याने देयक अदा करण्यात येईल. |
| २० | सदर काम करतेवेळी प्रत्यक्ष जागेवर वस्तुनिष्ठ अडचणी उद्भवल्यास त्या तात्काळ दूर करून विहित मुदतीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| २१ | निविदाधारकाने देवगड जामसंडे नगरपंचायतीचे हितास बाधा पोहचेल असे कोणतेही वर्तन केल्याचे तसेच विहित मुदतीत सेवा न दिल्याचे आढळून आल्यास सदर निविदाधारकाने जमा केलेली बयाणा रक्कम व अनामत रक्कम कोणतेही पूर्व सूचना न देता जप्त करण्याचा व सदर ठेका रद्द करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे. |
| २२ | उपरोक्त कामाच्या लेखापरीक्षणामध्ये कोणतेही मुद्दे उपस्थित झाल्यास त्याची पूर्तता करणे संबंधित मक्तेदारास बंधनकारक राहील. |
| २३ | सदर निविदेसंदर्भात निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याच्या अधिकार नगरपंचायतीने राखून ठेवला आहे. नाकारलेल्या निविदांची/ दरपत्रकांची कोणतीही तोंडी अथवा लेखी कारणे दिली जाणार नाहीत. |
| २४ | निविदेसोबत सादर करण्यात येणारे निविदा दर व सत्य प्रतिज्ञापत्र निविदा धारक उक्त निविदेच्या कामाच्या स्वरूपाचा पूर्ण अभ्यास करून तसेच कामगार, साहित्य उपलब्धता इत्यादी बाबी विचारात घेऊन कामाचे दर व प्रतिज्ञा पत्रसादर केल्याचे गृहीत धरण्यात येईल. |
| २५ | निविदा सूचना व निविदा प्रपत्र या निविदा प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे याची सर्व निविदाधारक यांनी नोंद घ्यावी. |
| २६ | ई-निविदेमधील व नगरपंचातीकडून अटी व शर्तीचा अभ्यास करूनच निविदेप्रक्रियेत सहभाग घेणेत यावा. अटी व शर्ती वरील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. |
| २७ | सदर कामाकरिता मनुष्यबळ सेवा पुरवठा यांचे प्रत्यक्षात परिमाणाप्रमाणे किमानवेतन अदा करण्याची जबाबदारी मक्तेदार यांची राहिल. |
| २८ | निविदा उघडण्याच्या तारखेला सुट्टी जाहीर झाली असल्यास त्या दिवसाचे कामकाज लगतच्या पुढील कामकाजाच्या दिवशी पार पाडण्यात येईल. |
| २९ | ज्या निविदाकारांची कागदपत्रे खोटी आढळून येतील अशा निविदाकारांची बयाणा रक्कम जप्त करणेत येईल. |
| ३० | शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निविदा अंतिम करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचेकडे राहतील. |
| ३१ | कंत्राटदाराने नेमलेल्या मजूर व इतर मनुष्यबळाची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असेल. त्यांच्याबाबत न्यायालयीन / आर्थिक दाव्यांचा निपटारा करणे ही कंत्राटदाराची जबाबदारी असेल. सदर कामांच्याबाबतीत न्यायालयीन निपटारा क असल्यास न्यायालयीन क्षेत्र देवगड राहील. |
| ३२ | सदर निविदेसंदर्भातील अपलोड केलेल्या आवश्यक त्या सर्व नमूद कागदपत्रांची उलटतपासणी करणेकरीता सदर कागदपत्रांचा एक संच (हार्डकॉपी) निविदाप्रक्रीया कालावधी संपुष्टात येण्याअगोदर देवगड जामसंडे नगरपंचायत कार्यालयात सादर करावा. |
| ३३ | महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४७/विमा प्रशासन यांजकडील दि.१३/०७/२०२२ च्या परिपत्रकानुसार कंत्राटी कामगारांच्या विम्याची रक्कम विहीत वेळेत भरणे मक्तेदारास बंधनकारक आहे. सदरची रक्कम भरणा न केल्यास दंड व व्याजासहीत देयकातून कपात करण्यात येईल. |
| ३४ | शासनामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार कचऱ्याची वर्गवारी करणे व योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. |
| ३५ | देवगड जामसंडे नगरपंचायत मार्फत राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता मोहीम, प्लास्टिक बंदी मोहीम तसेच शासन निर्देशानुसार वेळोवेळी केल्या जाणाऱ्या कारवाईकरिता कर्मचारी पुरविणे मक्तेदाराची जबाबदारी राहील. |
| ३६ | उपरोक्त कामाच्या लेखापरीक्षणामध्ये कोणतेही मुद्दे उपस्थित झाल्यास त्याची पूर्तता करणे संबंधित मक्तेदारास बंधनकारक राहील. |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| ३७ | कर्मचा-यांची आरोग्य तपासणी करून तसा अहवाल देवगड जामसंडे नगरपंचायत सादर करणे आवश्यक आहे. |
| ३८ | किमानवेतन कायदा १९६३ नियम २७ नुसार Wages Register ठेवणे बंधनकारक आहे. |
| ३९ | सदर कामाकरीता पुरविण्यात येणारे कर्मचारी हे कंत्राटी स्वरुपातील असून भविष्यात सदर कर्मचारी यांना नगरपंचायतीकडून कोणत्याही स्वरुपाचे लाभ मिळणार नाहीत किंवा सदर कर्मचारी हे याबाबत हक्क सांगणार नाही. |
| ४० | प्रत्येक महाच्या देयकासोबत नियुक्त कर्मचारी यांना किमान वेतन अदा केल्याबाबतचे पासबूक झेरॉक्स, EPF चलन, ESIC चलन, व्यवसाय कर भरणा पावती, नमुना नं. २७ सादर करणे बंधनकारक आहे व इतर परिपूर्ण आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. कागदपत्रांची छाननी केल्यानंतर योग्य कागदपत्रे असतील तर मक्तेदारांचे देयक अदा करणेत येईल. अन्यथा देयक अदा केले जाणार नाही. देयक अदा केले नाही म्हणुन कर्मचारी यांचे वेतन थांबविता येणार नाही. |
| ४१ | नगरपंचायतीकडून मक्तेदाराचे देयक अदा करण्यास काही अडचणी असल्या तरीही दर महिन्याच्या ०५ तारीखपर्यंत किमानवेतन प्रमाणे दरमहा वेतन देण्याची जबाबदारी मक्तेदाराची असेल. नगरपंचायतीकडून देयक अदा झाले नाही म्हणून मक्तेदार यांना कर्मचा-यांचे वेतन थांबवता येणार नाही. कींवा सदरील कारण देता येणार नाही. |
| ४२ | कर्मचारी कामावर नेमून दिलेल्या वेळेत हजर राहणे आवश्यक आहे. कर्मचा-यांनी वेळेचे बंधन न पाळता नेमून दिलेले काम विहित मुदतीत पूर्ण न झाल्यास सदर कर्मचारी गैरहजर असल्याचे समजण्यात येईल व सदर रक्कम मक्तेदार यांच्या देयकातून कपात करण्यात येईल. तसेच कर्मचारी उशीरा कामावर आल्यास प्रती कर्मचारी १०० रुपये दंड आकारण्यात येईल. |
| ४३ | स्वच्छता विभागाडील कामे अत्यावश्यक सेवेमध्ये येत असल्याने कर्मचारी ज्या दिवशी गैरहजर असेल त्यादिवशी सदर कर्मचा-याच्या बदली दुसरा कर्मचारी देणे आवश्यक आहे. १ दिवस जरी विनापरवानगी गैरहजर असलेल्या कर्मचा-यांमुळे नगरपंचायतीची कामे बंद ठेवल्यास दंड म्हणून २ दिवसांचे वेतन कपात करण्यात येईल. |
| ४४ | निविदेसंदर्भात अपलोड केलेल्या आवश्यक त्या सर्व नमुद कागदपत्रांची उलटतपासणी करणेकरीता कागदपत्रांचा एक संच (हार्डकॉपी) निविदा प्रक्रिया कालावधी संपुष्टात येण्या अगोदर देवगड जामसंडे नगरपचायत कार्यालयात सादर करावा. |
| ४५ | कंत्राटदार यांचे जे कर्मचारी घंटागाडीवर आहेत त्यांनी शासनाने दिलेल्या आदेशानुसार स्कॅनिंग करणे आवश्यक आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षण माझी वसुंधराची कामे करणे आवश्यक आहे. तसेच आयत्यावेळी नगरपंचायत नेमुन देईल ती कामे करणे आवश्यक आहे. त्याला नकार देता येणार नाही. तसेच केल्यास देयक अदा केले जाणार नाही. |
| ४६ | आपकालीन परीस्थितीच्या वेळी कर्मचारी यांनी नेमुन दिलेली कामे करणे आवश्यक आहे. ज्यावेळी आपकालीन परीस्थिती निर्माण होईल त्यावेळी त्वरीत ते काम करणे आवश्यक आहे त्यास नकार देता येणार नाही. |

मुख्याधिकारी
देवगड जामसंडे नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

# देवगड जामसंडे नगरपंचायत

मु.पो.ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग, पिन ४१६६१३

दुनध्वनी: देवगड (मुख्य कार्यालय) - (०२३६४) २६२२२३, २६३४७

**Email: devgadjamsandenp@gmail.com**


जा.क्र.११०० /२०२६ — दिनांक- १२/०५/२०२६

## निविदा सुचना

देवगड जामसंडे नगरपंचायत अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनाच्या दैनंदिन कामांकरीता वार्षिक मनुष्यबळ सेवा पुरवठा करणे या कामाची नगरपंचायत १५ वा वित्त आयोग / स्वनिधीमधून पहिली मागणी करीता कामाची ई निविदा सूचना शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १४/०५/२०२६ रोजी ऑनलाईन प्रसिध्द करणेत आलेली आहे. सदर निविदा भरणेकरिता अंतिम दिनांक २९/०५/२०२६ रोजी पर्यंत आहे.

देवगड जामसंडे नगरपंचायत * स्थापना २२ मार्च २०१६ जि. सिंधुदुर्ग

मुख्याधिकारी
देवगड जामसंडे नगरपंचायत
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

Signature Not Verified
Digitally signed by Vivek Vishnu Khot
Date: 2026.05.14 16:59:48 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with OKEN Scanner